## मराठा व बहुजनांत फूट पाडण्याचा डाव - पवार

..2


# मुंबई चौफेर

पाने 20 • किंमत ₹ 3

वर्ष २५ • अंक १०४ • मुंबई • रविवार, १२ ऑगस्ट २०१८


## नालासोपारा स्फोटकांप्रकरणी

## १२ जण एटीएसच्या ताब्यात

मुंबई - पालघरमधील नालासोपाऱ्यात जप्त करण्यात आलेल्या देशी बॉम्बप्रकरणी अटक केलेल्या तिघांच्या संपर्कात असलेल्या १२ जणांना चौकशीसाठी महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) ताब्यात घेतले आहे. त्यापैकी चार जणांची कसून चौकशी करून शनिवारी सायंकाळी सोडण्यात आले आहे. या सगळ्यांना मुंबई, पुणे, सातारा, सोलापूर आणि नालासोपारामधून ताब्यात घेण्यात आले असून, त्यांना चौकशीसाठी कोठडीत ठेवण्यात आले आहे. प्रकरणात त्यांची भूमिका असल्याचे समोर आल्यास त्यांना अटक केली जाईल, असेही एटीएस सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

(पान २ वर)

# मानसिक रुग्णांचा आधारवड



**आपल्याकडे आजही मानसिक आजारांनी ग्रस्त असलेल्या व्यक्तींना काहीशा तिरस्कारानेच पाहिले जाते. अनेक रुग्णांना घरातल्यांकडूनच अत्यंत हीन दर्जाची वागणूक मिळते. डॉ. भारत आणि स्मिता वाटवानी या दाम्पत्याने अशा रुग्णांना हक्काचा निवारा मिळवून देऊन समाजात सन्मानाने उभे राहण्यासाठीचे पाठबळही दिलं. १९८८ पासून त्यांनी मानसिक रुग्णांची सेवा करण्याचा वसा घेतला आहे. त्यांना जाहीर झालेला मॅगसेसे पुरस्कार त्याच निष्काम तपस्येचे फळ आहे.**

यंदाचे रेमन मॅगसेसे पुरस्कार विजेते जाहीर होईपर्यंत डॉ. भारत वाटवानी हे नाव कोणाला फारसे माहीतदेखील नव्हते. विजेत्यांच्या यादीत त्यांचे नाव जाहीर झाल्यावर या कर्मयोग्याच्या कामाची माहिती घेण्यासाठी अनेक जण आतूर झाले. मॅगसेसे पारितोषिकाचे दुसरे विजेते भारत वाटवानी हे मानसिक आजारांनी त्रस्त असलेल्या बेघरांसाठी काम करणारे धाडसी व्यक्ती म्हणून सर्वज्ञात आहेत. अशा लोकांना समाजानं अत्यंत वाईट प्रकारे बहिष्कृत केले असले तरी डॉ. वाटवानी यांनी त्यांना स्वाभिमान परत मिळवून देण्यासाठी सातत्यपूर्ण आणि अत्यंत निष्ठापूर्वक काम केले आहे. डॉ. वाटवानी मानसोपचारतज्ज्ञ आहेत. त्यांनी स्मिता या त्यांच्या पत्नीच्या साहाय्याने मानसिक आजाराने त्रस्त असलेल्या रस्त्यावर पडलेल्या लोकांना आपल्या दवाखान्यात आणून उपचार करण्यास सुरुवात केली. त्यांच्या या कामाची सुरुवात अगदी योगायोगानेच झाली. ते स्मिता यांच्यासह एका रेस्टॉरंटमध्ये गेले असताना त्यांना तिथे एका व्यक्तीचे वर्तन मानसिक रुग्णासारखे दिसले. त्याने पिण्यासाठी पाणी हवे म्हणून नारळाच्या करवंटीत गटारातील पाणी भरले. या दाम्पत्याने हटकताच केलेल्या हालचालींवरून तो स्किझोफ्रेनिक असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी त्याला आपल्या घरी आणले आणि नंतर त्याच्यावर उपचार करून त्याला आंध्र प्रदेशातील त्याच्या कुटुंबात पाठवून दिले. प्रत्यक्षात त्याने पॅथॉलॉजीचा अभ्यासक्रम पूर्ण केला असल्याचेही आढळले. त्यानंतर त्याचे चांगल्या प्रकारे पुनर्वसन झाले आणि या दाम्पत्याने या कामाचा विडा उचलला.

१९८८ मध्ये त्यांनी श्रद्धा पुनर्वास फाऊंडेशनची स्थापना केली. या फाऊंडेशनतर्फे त्यांनी हाती घेतलेल्या मोहिमेत मानसिक आजारी लोकांना मोफत आश्रय दिला जातो. त्यांच्या भोजनाची सोय केली जाते आणि त्यांच्यावर मोफत उपचारही केले जातात. रस्त्यावर राहणाऱ्या मुलांना, मुलींना आणि इतर व्यक्तींनाही त्यांच्या मानसिक दुरवस्थेतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी मौल्यवान प्रयत्न केले आहेत. गेल्या तीस वर्षांमध्ये भारत, बांगलादेश आणि नेपाळमधील सुमारे ७००० स्किझोफ्रेनिक रुग्णांवर उपचार केले आणि त्यांच्या कुटुंबीयांसमवेत त्यांची भेट घालून दिली. सध्या अशा व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी त्यांनी मुंबईजवळ कर्जतमध्ये श्रद्धा रिहॅबिलिटेशन सेंटरची स्थापना केली आहे. तिथे १२० भटके मानसिक रुग्ण राहतात. २०१८ या एकाच वर्षात त्यांनी ४८९ मनोरुग्णांचे त्यांच्या कुटुंबांमध्ये पुनर्वसन केले आहे. कुटुंबांमध्ये पुनर्वसन करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना ९८ टक्के यश आले आहे. त्यांच्याकडे सामाजिक कार्यकर्त्यांची मोठी टीम आहे. देशाच्या विविध भागांमध्ये असलेले हे कार्यकर्ते रुग्णांच्या कुटुंबीयांना शोधण्याचे काम करतात. सध्या बोरिवलीत या संस्थेचे काम सुरू आहे. त्यांनी दहिसरपासून कामाची सुरुवात केली. दिवंगत ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांच्या कामापासून स्फूर्ती घेऊन त्यांनी काम सुरू ठेवले आहे. मदर तेरेसा आणि गुरुदेव रवींद्रनाथ टागोर ही त्यांची स्फूर्तिस्थाने आहेत.

सुरुवातीला मुंबईत काम केल्यानंतर मुंबईबाहेरच्या व्यक्तींवर उपचारांसाठी कर्जतजवळ सुमारे साडेसहा एकरात त्यांनी आपल्या संस्थेची इमारत उभारली आहे. आमिर खानच्या 'सत्यमेव जयते' या कार्यक्रमात त्यांच्या कामाची दखल घेण्यात आली होती.